महाराष्ट्र शासन
# महाराष्ट्र लोकसेवा आयोग
त्रिशूल गोल्ड फिल्ड, प्लॉट नंबर ३४, सरोवर विहार समोर, सेक्टर ११, सीबीडी बेलापूर, नवी मुंबई-४००६१४ ०२२-६९१२३९९००
Email ID : contact-secretary@mpsc.gov.in Website : https://mpsc.gov.in , https://mpsconline.gov.in
@mpsc_office @official_mpsc

क्रमांक:सीबीटी-०६२२/प्र.क्र.१४/२०२२/३१ दिनांक : १९ जानेवारी, २०२४

**-: प्रसिध्दीपत्रक:-**

**विषय: चाळणी परीक्षा - प्रवेश प्रमाणपत्राबाबत**

महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत दिनांक २८ जानेवारी, २०२४ रोजी नियोजित **विविध विभागातील खाली नमूद** संवर्गाच्या संगणक प्रणालीवर आधारित चाळणी परीक्षांकरीता प्रवेश दिलेल्या उमेदवारांची प्रवेश प्रमाणपत्रे आयोगाच्या ऑनलाईन अर्जप्रणालीच्या https://mpsconline.gov.in संकेतस्थळावरील त्यांच्या खात्यामध्ये उपलब्ध करुन देण्यात येत आहेत:-

| अ.क्र. | जाहिरात क्रमांक | संवर्ग | परीक्षा दिनांक व वेळ |
|---|---|---|---|
| १ | ९५/२०२२ | वन साख्यिंकी, सामान्य राज्य सेवा, गट-अ | २८ जानेवारी, २०२४ सकाळी ०८:३० ते ०९:३० |
| २ | ९८/२०२२ | संशोधन अधिकारी/सांख्यिकी अधिकारी, सामान्य राज्य सेवा, गट- ब | |
| ३ | १०६/२०२२ | वैद्यकीय अधिक्षक (निम्न श्रेणी), महाराष्ट्र वैद्यकीय विमा सेवा, गट-अ | २८ जानेवारी, २०२४ दुपारी १२:३० ते ०१:३० |
| ४ | १७/२०२३ | वैद्यकीय अधिकारी, महाराष्ट्र वैद्यकीय विमा सेवा, गट-अ | |
| ५ | २७/२०२२ | अधिव्याख्याता/सहायक प्राध्यापक (शुश्रृषा सेवा), महाराष्ट्र वैद्यकीय व संशोधन सेवा, गट-ब | २८ जानेवारी, २०२४ दुपारी ०४:३० ते ०५:३० |

**२.** परीक्षा कक्षात प्रवेश मिळविण्यासाठी आयोगाच्या संकेतस्थळावरुन डाऊनलोड करुन प्रिंट केलेले मूळ स्वरुपातील प्रवेश प्रमाणपत्र सोबत आणणे अनिवार्य आहे. त्याशिवाय परीक्षेस प्रवेश दिला जाणार नाही.

**३.** परीक्षेच्या दिवशी ऐनवेळी उद्भवू शकणा-या अडचणी अथवा आंदोलने, मोर्चे, वाहतूक समस्या, अतिवृष्टी इत्यादी बाबी लक्षात घेऊन, परीक्षा सुरु होण्याच्या वेळेपूर्वी किमान **दीड तास** अगोदर संबंधित परीक्षा उपकेंद्रावर उपस्थित राहणे तसेच, प्रत्यक्ष परीक्षा सुरु होण्याच्या वेळेपूर्वी अर्धा तास अगोदर परीक्षा कक्षातील स्वत:च्या बैठक क्रमांकावर उपस्थित राहणे अनिवार्य आहे.

**४. परीक्षा कक्षातील अंतिम प्रवेशासाठी विहित केलेल्या वेळेनंतर कोणत्याही परिस्थितीत उमेदवारांना परीक्षा कक्षामध्ये प्रवेश दिला जाणार नाही अथवा यासंदर्भात आयोगाची कोणत्याही प्रकारची जबाबदारी राहणार नाही.**

**५.** आयोगाच्या संकेतस्थळावरील ‘उमेदवारांना सर्वसाधारण सूचना’, प्रवेश प्रमाणपत्रावरील सूचना, परीक्षेच्या वेळी शारीरिक / परस्पर अंतराच्या (Social Distancing) अनुषंगाने करावयाची कार्यवाही / उपाययोजना संदर्भातील सूचना यांचे उमेदवारांनी पालन करणे अनिवार्य आहे. सदर सूचनांचे उल्लंघन करणा-या उमेदवारांवर आयोगाच्या स्वेच्छाधिकारानुसार कारवाई करण्यात येईल. तसेच, प्रचलित नियम / कायद्यातील तरतुदीनुसारही कारवाई करण्यात येईल.

**६.** प्रवेशप्रमाणपत्र मिळण्यात कोणतीही अडचण उद्भवल्यास उमेदवारास आयोगाच्या contact-secretary@mpsc.gov.in किंवा support-online@mpsc.gov.in या ईमेल आणि/अथवा १८००-१२३४-२७५ किंवा ७३०३८२१८२२ या दूरध्वनी क्रमांकावरुन विहित वेळेत आवश्यक मदत प्राप्त करुन घेता येईल.

**७.** संगणक प्रणालीवर आधारित चाळणी परीक्षांकरीता उमेदवारांना सराव करता यावा यासाठी आयोगाच्या https://mpsc.gov.in या संकेतस्थळावरील 'ONLINE FACILITIES' या मेनूमध्ये 'Computer Based Examinations>Mock Test' येथे एक वेबलिंक उपलब्ध करून देण्यात येत आहे. सदर मॉकटेस्ट ही केवळ सरावासाठी असुन प्रत्यक्ष परीक्षेचा कालावधी व गुण संबंधित परीक्षेच्या परीक्षा योजना व अभ्यासक्रमानुसार असेल.

ठिकाण : नवी मुंबई

सह सचिव,<br>
दक्षता, धोरण व संशोधन,<br>
महाराष्ट्र लोकसेवा आयोग